## ४) परीक्षेस प्रविष्ठ होणेसाठी पात्रतेच्या अटी व शर्ती

### ४.अ) वयोमर्यादा व परीक्षा प्रवेश पात्रता :

४.अ.१) जाहिरातीत नमूद केलेल्या परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या परीक्षार्थीस किमान व कमाल वयाची अट लागू नाही. मात्र परीक्षार्थीने प्राथमिक शिक्षणाच्या स्तराप्रमाणे विहित व्यावसायिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

४.अ.२) अर्हतेच्या अंतीम वर्षात प्रविष्ठ असलेला उमेदवार TET २०१५ परीक्षेसाठी अपात्र राहील.

### ४.आ) शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता :-

४.आ.१) इयत्ता पहिली ते पाचवीकरिता (सर्व माध्यमे) :- महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक : आरटीई २०१०/प्र.क्र.५७२/ प्राशि - १, दि. १३ फेब्रुवारी २०१३, ९ सप्टेंबर २०१४ व ३ डिसेंबर २०१४ नुसार प्राथमिक शिक्षक पदास शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता राहील याची नोंद घ्यावी.

**(हे शासननिर्णय परीक्षा परिषदेच्या mahatet.in व mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)**

४.आ. २) इयत्ता ६ वी ते ८ वी करिता (सर्व माध्यमे) :- महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक : आरटीई २०१०/प्र.क्र.५७२/ प्राशि - १, दि. १३ फेब्रुवारी २०१३, ९ सप्टेंबर २०१४ व ३ डिसेंबर २०१४ नुसार प्राथमिक शिक्षक पदास शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता राहील याची नोंद घ्यावी.

**(हे शासननिर्णय परीक्षा परिषदेच्या mahatet.in व mscepune.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)**

**४.आ.३)** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक:आरटीई २०१३/ प्र.क्र.५७२/प्राशि - १, दि. १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासननिर्णयाबाबतच्या दि. ९ सप्टेंबर २०१४ व ३ डिसेंबर २०१४ च्या शुद्धीपत्रकांची नोंद घ्यावी. तसेच वेळोवेळी अद्यावत झालेले/ होणारे शासननिर्णय, परिपत्रके यांचीही नोंद घ्यावी.

### ४.इ) परीक्षा शुल्क -

४.इ.१) क) पेपर १ किंवा पेपर २ यापैकी एका परीक्षेकरिता पूर्ण भरलेल्या अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील व इतर मागास (ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी) परीक्षार्थीने रु.५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गातील (एस.सी., एस.टी, व अपंग) उमेदवाराने रु. २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) चलनाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या किंवा स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेत

त्या शाखेने निर्धारित केलेल्या वेळेच्या मर्यादेमध्ये भरावे. भरलेल्या संबंधित चलनाचा Transaction Id क्रमांक व रक्कमेचा अंक आवेदपनपत्रामध्ये लिहिणे आवश्यक आहे. (**चलनाचा नमुना संकेतस्थळावर आहे.** )

४.इ.२) ख) पेपर १ व पेपर २ या दोनही परीक्षेकरीता पूर्ण भरलेल्या अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील व इतर मागास ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी परीक्षार्थीने रु.८००/- (अक्षरी रुपये आठशे फक्त) व मागासवर्गीय प्रवर्गातील (एस.सी., एस.टी, व अपंग) उमेदवाराने रु. ४००/- (अक्षरी रुपये चारशे फक्त) चलनाने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आणि स्टेट बँक ऑफ हैद्राबादच्या कोणत्याही शाखेत त्या शाखेने निर्धारित केलेल्या वेळेच्या मर्यादेमध्ये भरावे. भरलेल्या संबंधित चलनाचा Transaction Id क्रमांक व रक्कमेचा अंक आवेदपनपत्रामध्ये लिहिणे आवश्यक आहे. (चलनाचा नमुना संकेतस्थळावर आहे.)

४. इ. २) सदर शुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

४. इ. ३) चलनाव्यतिरिक्त अन्य पद्धतीने भरलेले शुल्क स्वीकृत केले जाणार नाही व असे अर्ज रद्द समजण्यात येतील.

४. इ. ४) अन्य प्रकारे भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

४. इ. ५) उपरोक्त चलनाची प्रत अर्जाच्या छापील प्रती (Hard copy) सोबत सादर करावयाची आहे. राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्राची व अपंग उमेदवारांनी अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करावयाची आहे.

**४. ई) परीक्षेचा आराखडा**

४. ई. १)एन सी टी ई (NCTE) च्या मार्गदर्शक सूचना माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

४. ई. २) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक:आरटीई २०१३/प्र.क्र.९१/प्राशि - १, दि. २३ ऑगस्ट, २०१३ नुसार व वेळोवेळी निर्गमित झालेल्या व होणाऱ्या शासननिर्णयानुसार परीक्षेचा अभ्यासक्रम व आराखडा राहील याची नोंद घ्यावी.

- महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक:आरटीई २०१३/ प्र.क्र.९१/प्राशि - १, दि. २३ ऑगस्ट, २०१३ च्या शासननिर्णयाबाबतच्या दि. ९ सप्टेंबर २०१४ व ३ डिसेंबर २०१४ च्या शुद्धीपत्रकांची नोंद घ्यावी.

(हे शासननिर्णय परीक्षा परिषदेच्याही संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.)

४. ई.३) उपरोक्त शासननिर्णयात नमूद केल्याप्रमाणे परीक्षा घेण्यात येईल. शासननिर्णयाचे अचूक वाचन करावे.

४. ई.४) परीक्षेसंबंधी विषयनिहाय निर्धारित गुण व आराखडा सूचना पत्रातील प्रमुख बाबींची यादी मधील बाब क्र. ९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे राहील याची नोंद घ्यावी.

४. ई.५) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत परीक्षा राहील याची नोंद घ्यावी.

४. उ) **<u>शिक्षक पात्रता परीक्षा</u> - <u>प्रश्नपत्रिका : प्रश्नपत्रिकेसंबंधाने खालील सूचनांची नोंद परीक्षार्थीने घ्यावी.</u>**

४.उ.१) परीक्षार्थीने मोबाईल फोन, कॅलक्युलेटर, पेजर व तत्सम अशा प्रकारचे इलेक्टॉनिक साहित्य किंवा इतर कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे स्वत:जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे.

४.उ.२) प्रश्नपत्रिकेमध्ये सलग विषयनिहाय प्रश्न असून ते सोडविण्यासाठी परीक्षार्थीस निर्धारित केलेला वेळ देण्यात आलेला आहे. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक राहील.

४.उ.३) प्रत्येक प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरुपाचा असून प्रश्नाच्या खाली क्रमांकासह उत्तराचे पर्याय दिलेले आहेत. उत्तरपत्रिकेत उत्तर नोंदविताना चार पर्यायांपैकी बरोबर उत्तर असलेल्या पर्यायाचा क्रमांक निवडून उत्तरपत्रिकेत दिलेल्या त्या पर्याय क्रमांकाच्या वर्तुळाला काळ्या / निळ्या शाईच्या बॉलपेनने पूर्णपणे गिरविणे (छायांकित करणे) आवश्यक आहे. असे गिरविलेले उत्तरच तपासले जाईल याची नोंद घ्यावी.

४.उ.४) अर्धवट गिरवलेले वर्तुळ, खाडाखोड अथवा एकाच प्रश्नासाठी दोन वर्तुळे गिरविलेली असतील अशी उत्तरे तपासली जाणार नाहीत व त्यांना गुण दिले जाणार नाहीत, याचीही नोंद घ्यावी.

४.उ.५) पेन्सिलीने गिरवून नोंदविलेल्या उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ तपासले जाणार नाही म्हणून उत्तर क्रमांक गिरविण्यासाठी पेन्सिल वापरु नये.

४.उ.६) एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही

४.उ.७) प्रत्यक्ष परीक्षा झाल्यानंतर शक्यतो एक आठवड्याचे आत संभाव्य उत्तरसूची परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

**४.उ.८) प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांबाबत आक्षेप प्राप्त झाल्यास प्राप्त आक्षेपांनुसार व कोणत्याही कारणामुळे प्रश्न (प्रश्न व पर्यायी उत्तरे) चुकीचे आहेत असे आढळल्यास व परिषदेच्या तज्ज्ञ समितीने ते मान्य केल्यास ते प्रश्न रद्द करून उर्वरित अचूक प्रश्नांच्या गुणांनुसार परिषदेने निश्चित केलेल्या गणिती सूत्रानुसार टक्केवारी काढून पात्रता निश्चित करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

४.उ.९) परीक्षार्थींनी आपला बैठक क्रमांक त्यांना पुरविलेल्या प्रश्नपत्रिकेवर दिलेल्या निर्धारित जागी नोंदविणे आवश्यक आहे.

४.उ.१०) प्रश्नपत्रिकेवर प्रत्यक्ष परीक्षेच्या वेळी व परीक्षा झाल्यानंतरही कोणत्याही प्रश्नांच्या उत्तराची नोंद करू नये.

४.उ.११) कच्चे काम करण्यासाठी प्रश्नपत्रिकेच्या शेवटच्या पानावर दिलेल्या कोऱ्या जागेचा वापर करावा. अन्य ठिकाणी कच्चे काम करण्यात येऊ नये.

४.उ.१२) परीक्षार्थीने प्रश्नपत्रिकेवर उत्तरपत्रिका क्रमांक व उत्तरपत्रिकेवर प्रश्नपत्रिका क्रमांक आणि स्वाक्षरीपटावर दोन्ही क्रमांक नमूद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. स्वाक्षरी पटावर उमेदवाराची स्वाक्षरी नसल्यास सदर उमेदवार परीक्षेसाठी गैरहजर समजण्यात येईल.

४.उ.१३) परीक्षागृहामध्ये परीक्षा प्रवेशपत्राची मागणी केल्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रवेशपत्र परीक्षेनंतर उमेदवाराकडेच राहील. केंद्रसंचालक/पर्यवेक्षकाकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.

४.उ.१४) परीक्षार्थीने परीक्षा चालू असताना व परीक्षा झाल्यानंतर कोणताही गैरप्रकार केल्यास अथवा परीक्षा संपल्यानंतर परीक्षेसंबंधी कोणतेही साहित्य परीक्षागृहाबाहेर नेल्यास / नेल्याचे निदर्शनास आल्यास त्याची चौकशी होऊन त्याची या परीक्षेशी संबंधित संपादणूक रद्द करण्यात येईल. त्याचबरोबर त्यांचेविरुद्ध भारतीय दंडसंहिता (IPC) अंतर्गत कारवाई करण्यात येईल.

४.उ.१५) परीक्षेसंबंधी दिलेल्या कोणत्याही सूचनेचा भंग केल्यास तो गैरप्रकार समजण्यात येईल व परिषदेने विहित केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे चौकशी करून कारवाई करण्यात येईल.

४.उ.१६) परीक्षा ही मराठी, इंग्रजी व उर्दू या तीन माध्यमातून घेण्यात येईल. परीक्षार्थींना त्यांनी निवडलेल्या माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात येईल.

- उर्दू माध्यमाच्या परीक्षार्थींना हस्तलिखित स्कॅनिंग केलेल्या प्रश्नपत्रिकेसोबत डी.टी.पी. केलेली प्रश्नपत्रिका देण्यात येईल.

४. ऊ) <u>**शिक्षक पात्रता परीक्षा - उत्तरपत्रिका : उत्तरपत्रिकेसंबंधाने खालील सूचनांची नोंद उमेदवाराने घ्यावी**</u>

४.ऊ.१) उत्तरपत्रिकेवर निर्धारित जागी आपला बैठक क्रमांक अचूक नोंदवावा. तसेच बैठक क्रमांकातील अंक, त्याखाली दिलेल्या अंकाचे वर्तुळ अचूकरीत्या गिरवावे.

४.ऊ.२) प्रत्येक प्रश्नाचे एकच उत्तर बरोबर आहे त्यामुळे एकदा दिलेले उत्तर बदलता येणार नाही.

४.ऊ.३) उत्तराच्या क्रमांकाचे वर्तुळ गिरविण्यासाठी काळी किंवा निळी शाई असलेल्या बॉलपेनचा वापर करा. काळ्या किंवा निळ्या शाईने गिरविलेले वर्तुळ खोडण्याचा/ बदलण्याचा प्रयत्न करु नका.

४.ऊ.४) कृपया पूर्ण वर्तुळ काळे किंवा निळे करा.

४.ऊ.५) कृपया उत्तरपत्रिकेवर कच्चे काम किंवा खाडाखोड करू नका.

४.ऊ.६) आधी काळे किंवा निळे केलेले वर्तुळ पुसण्यासाठी खोडरबर, ब्लेड किंवा व्हाईटनरचा उपयोग करु नका.

४.ऊ.७) एका प्रश्नाला एकच उत्तर अचूक असल्याने एका उत्तराला एकापेक्षा जास्त वर्तुळे काळी किंवा निळी केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल आणि त्या उत्तराला गुण दिले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

४.ऊ.८) उत्तरपत्रिका दुमडू नये, किंवा फाडू नये, किंवा त्यास टाचणी/ पिना लावू अथवा टोचू नये.

४.ऊ.९) आपले उत्तर नोंदविणेसाठी खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे उत्तर क्रमांकाचे वर्तुळ भरावे.




४.ऊ.१०) परीक्षा कालावधी संपल्यानंतर मूळ उत्तरपत्रिका पर्यवेक्षकाकडे देऊन कार्बनलेस दुसरी प्रत परत घेऊन त्याबद्दलची स्वाक्षरी स्वाक्षरीपटावर करावी. ही स्वाक्षरी नसल्यास आपण उत्तरपत्रिका जमा केली नाही असे समजण्यात येईल.

४.ऊ.११) उर्दू माध्यमाच्या परीक्षार्थींना भाषा-२ मराठी किंवा इंग्रजी यापैकी एक भाषा निवडायची आहे. त्यामुळे त्यांनी निवडलेल्या भाषेसमोरील गोल रंगवावा.

**४.ए) टीईटी पात्रता निकष -**

४.ए.१) शासननिर्णय क्रमांक : आरटीई २०१३/प्र.क्र.९१/प्राशि - १,दि. २३ ऑगस्ट, २०१३ च्या शासननिर्णयातील तरतुदीनुसार व NCTE च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार परीक्षार्थी शिक्षक पात्रता प्रमाणपत्र धारण करण्यास परीक्षार्थीने पात्रता परीक्षेत एकूण गुणांच्या किमान ६०% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.मात्र मागासवर्गीयांसाठी व अपंगांसाठी प्राप्त गुणांमध्ये ५% गुणांची सवलत राहील.

४.ए.२) शिक्षक पात्रता प्रमाणपत्र देण्यापूर्वी कागदपत्रांची व सर्व आवश्यक प्रमाणपत्रांची पडताळणी केली जाईल त्यानंतर उपरोक्त निकष पूर्ण करण्याऱ्या संबंधित उमेदवारांना परिषदेने विहित केलेल्या नमुन्यात शिक्षक पात्रता प्रमाणपत्र देण्यात येईल.

४.ए.३) शिक्षक पात्रता प्रमाणपत्र केवळ शिक्षक पदासाठीची पात्रता सिद्ध करते. शिक्षक पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाले म्हणून नोकरीचा व इतर लाभाचा हक्क सांगता येणार नाही.

४.ए.४) शिक्षक पात्रता प्रमाणपत्राशिवाय शिक्षक पदावरील सेवेसाठी व नोकरीसाठी त्या पदाच्या विहित अटींची पूर्तता करणे उमेदवारास बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

४.ए.५) कोणत्याही ठिकाणच्या नोकरीसाठी परिषदेकडे कोणताही पत्रव्यवहार करण्यात येऊ नये, याचीही नोंद घ्यावी.